# मेट्रो-३ देशातील अवघड प्रकल्प

## मेट्रो मॅन ई. श्रीधरन यांचे मत



ई. श्रीधरन

मुंबई, ता. १७ : 'देशभरातील पायाभूत प्रकल्पांच्या क्षेत्रात मेट्रो- ३ चा भुयारी मार्ग बांधण्याच्या दृष्टीने अत्यंत अवघड आहे. अभियंत्यांनी प्रामाणिकपणा, कामातील सचोटी व सामाजिक बांधिलकी बाळगली तर पैसा व वेळ वाचेल', असा मूलमंत्र मेट्रो मॅन ई. श्रीधरन यांनी दिला. मुंबई मेट्रो रेल महामंडळांच्या परिषदेत ते बोलत होते.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ दरम्यानच्या मेट्रो- ३ प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनन करत आहे. या प्रकल्पासाठी जगभरात विख्यात असलेले मेट्रो मॅन ई. श्रीधरन हे मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्यांसाठी मुख्य सल्लागार म्हणून जबाबदारी पाहत आहेत. अभियंते व अधिकाऱ्यांसाठी घेतलेल्या विशेष परिषदेत ई. श्रीधरन यांनी मार्गदर्शन केले. मेट्रो- ३ प्रकल्पाच्या निमित्ताने येणाऱ्या संभाव्य आव्हानांची त्यांनी अभियंत्यांना कल्पना दिली. देशभरातील पायाभूत प्रकल्पांच्या बांधणीत हा भुयारी मार्ग अवघड असल्याचे त्यांनी नमूद केले. 'समयसूचकता, व्यावसायिकता, निविदा व्यवस्थापन, सामाजिक बांधिलकी व प्रामाणिकपणा हे पंचसूत्र ध्यानी घेतले तर कुठल्याही प्रकल्पात पैसा व वेळ वाया जाणार नाही. बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यात कामाचा दर्जा व सुरक्षेचे महत्त्व आहे', असे ई. श्रीधरन म्हणाले. या वेळी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी ई-श्रीधरन यांचे आभार मानले. त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप काही आहे.